साप्ताहिक तेरणातीर - 11 ते 17 ऑक्टोबर 2021

तेरणातीर सोमवार दि. ११ ते १७ ऑक्टोबर २०२१

# कै.रसिका महाविद्यालयात फिट इंडिया फ्रीडम उपक्रम संपन्न



देवणी(प्रतिनिधी): भारतीय स्वातंत्र्याला पंचेहत्तर वर्ष पूर्ण झाल्याबद्दल मिनिस्ट्री ऑफ युथ अफेअर्स अँड स्पोर्टस मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त कै. रसिका महाविद्यालयात फिट इंडिया फ्रीडम रन हा उपक्रम घेण्यात आला आहे. 'फिट इंडिया फ्रीडम रन' अंतर्गत फिटनेस का डोज, आधा घंटा रोज या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे, क्रीडा संचालक डॉ. सचिन चामले, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.गोपाल सोमाणी यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला. आठ दिवस हा उपक्रम घेऊन फिटनेस संबंधी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर यांच्यामध्ये जागृती करण्यात येणार आहे. असे संयोजक क्रीडा संचालक डॉ. सचिन चामले, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.गोपाल सोमाणी यांनी यावेळी सांगितले.

यशस्वी

पोलीस हुल

आ न अ

## मंगेशकर महावि कार्यक्रमाने लता

औराद शहाजानी(प्रतिनिधी): येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात संगीत विभागाच्यावतीने

साप्ताहिक तेरणातीर 18 ते 24 ऑक्टोबर 2021

...शिक्षणप्रेमी ,व पत्रकार उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कन्नड व मराठी भाषेत श्री उल्हास ... सर आणि संगमेश मंगणे यांनी केले. या आदि.

# कै.रसिका महाविद्यालय देवणी येथे कोरोना लसीकरण शिबिर संपन्न



देवणी(प्रतिनिधी): महाविद्यालय सुरु करायचे असतील तर सर्वांनी कोरोनाची लस घेणे आवश्यक आहे असे प्रतिपादन देवणी येथील तहसीलदार सुरेश घोळवे यांनी कै.रसिका महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित कोरोना लसीकरण शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलत असताना केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे, ग्रामीण रुग्णालय देवणी येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. बिरादार, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ.गोपाल सोमाणी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्राचे केंद्र संयोजक प्रा.डॉ. प्रशांत भंडे रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. विजयकुमार मोरे, ग्रंथपाल डॉ. शिवाजी सोनटक्के, प्राध्यापक महादेव टेंकाळे प्राणीशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. पी. आर. मोरे इ.उपस्थित होते. या शिबिरात विद्यार्थी, पालक व कर्मचारी यांना कोवीशिल्ड, कोव्हॅक्सीन पसंतीनुसार लसीचा पहिला तर ज्यांचा पहिला डोस झालेला आहे त्यांना दुसरा डोस देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रशांत भंडे यांनी केले. आभार प्रा. डॉ गोपाल सोमाणी यांनी व्यक्त केले.

Gopal

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
कै रसिका महाविद्यालय देवणी

Principal
Kal. Rasika Mahavidyalaya
Deoni Dist. Latur

साप्ताहिक तेरणातीर 03 ते 09 जानेवारी 2022



## कै.रसिका महाविद्यालयात सुशासन दिन साजरा

देवणी(प्रतिनिधी): कै. रसिका महाविद्यालय देवणी येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारताचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचा जन्मदिवस सुशासन दिन म्हणून साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ चंद्रकांत जावळे उपस्थित होते. गणित विभाग प्रमुख डॉ. योगेश मुळे यांनी विद्यार्थ्यांना माहिती अधिकाराचे महत्व व प्रक्रिया यासंबंधी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गोपाल सोमाणी, प्रा. महादेव टेंकाळे, प्रा. अंकुश भुसावळे, डॉ. प्रशांत भंडे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन गोदावरी शिंदे यांनी केले.

तेरणातीर

Gopal
कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
कै. रसिका महाविद्यालय देवणी

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya
Deoni Dist. Latur